## कापूर तुळस

***Aerva lanata* (L.) Juss. ex Schult.**  Family – **Amaranthaceae**



**विविध भाषांमधील नावे:**
संस्कृत : गोरक्षगांजा, अश्मभेद; मराठी : कापूर तुळस, कापूरमाधुरी, शतकभेदी, पाषाणभेदी ; पंजाबी : भूईकलतों; कोंकणी : तांडलो ; इंग्लीश:मौटाईन क्रोत ग्रास ; तमिळ : चिरुबुल्ले ; कन्नड : बिली हिंदी: सोप्पू

**Morphology:**
Herb, erect, branched, pubescent or woolly- tomentose; leaves elliptic or obovate, entire, pubescent above, more or less white with cottony hairs beneath; flowers greenish white, very small, closely crowded and forming globose clusters.

**वनस्पतीचे वर्णन:**
तुळशी सारखे वाढणारे एक छोटे झाड आहे. याची पाने भुरकट हिरवी असतात. पानांवर  लव असते. याच्या उभ्या फांद्यांना लव असते. तुळशी प्रमाणे याला तुरे असतात. फुले मृदू फिक्कट जांभळी लहान व तुऱ्यानी येतात. फुलामध्ये एक बी असते. मुळास व पानास कापूरसारखा सुगंध येतो. याच्या बियांचे तेल काढतात.



**बहर  येण्याचा कालावधी :** सप्टेंबर – जानेवारी

**औषधी उपयोग:**
परमा, पोटदुखी, अपचन, विषमज्वर, अश्मरी, मुत्रकृच्छ, दमा इत्यादी आजारांवर उपयोगी आहे. संपूर्ण झाडाचा काढा करून काही दिवस प्राशन केल्याने किडनी स्टोन पूर्णपणे विरघळतो.

**लागवड :**
कापूर तुळशीची लागवड बियांपासून सप्टेंबर महिन्यामध्ये केली जाते. प्रत्येक दोन झाडांमध्ये अंदाजे ३० सेंमी अंतर ठेवले पाहिजे.  झाडाच्या योग्य वाढीकरिता सूर्य प्रकाशाची गरज असते.